मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
मंत्रालय,तिसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३३८१/२२७९३०५५ ईमेल आयडी: dofa.wrd@maharashtra.gov.in

**ई-मेलद्वारे/अतितात्काळ**

क्रमांक:संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१२/आ(क्षेप्र) दिनांक:०९ मार्च, २०२३.

प्रति,

१) महासंचालक, संकल्पन, पशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा नाशिक.
२) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
३) जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता.
४) सचिव, महाराष्ट्र मध्यप्रदेश आंतर राज्य नियंत्रण मंडळ, नागपूर.
५) अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक/अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणीतंटा लवाद कक्ष, पुणे/अधीक्षक अभियंता व सचिव, महाराष्ट्र मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर.
६) सर्व अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, ठाणे /पुणे /नागपूर /औरंगाबाद व अमरावती.

विषय:-कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ति शुल्काची वसुलीबाबत.

संदर्भ:- वित्त विभाग,शासन निर्णय क्र.घभाव-२०२२/प्र.क्र.०७/२०२२/सेवा-५, दिनांक १९ जानेवारी, २०२३ चे शासन निर्णय.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन वित्त विभागाच्या, शासन निर्णयाचे कृपया अवलोकन करावे.

२. उपरोक्त वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार शासकीय निवासस्थानाच्या अनुज्ञप्ती शुल्काची सुधारीत दराने वसुली शिवाय सेवा शुल्काची स्वतंत्र वसुली दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२३ पासून अमंलबजावणी करण्याबाबतच्या तरतुदीनुसार, सदर शासननिर्णयात दर्शविण्यात आलेल्या विवरणपत्रानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना वित्त विभागाने निर्गमित केल्या आहेत.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक निवासस्थानासाठी किंवा निवासस्थानाच्या समुहांसाठी सेवा शुल्काचे सुधारित दर दर्शविणारे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

३. त्यानुसार सदर विषयाच्या अनुषंगाने वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/शासन निर्णय विचारात घेवून कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(दिलीप पां. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

कार्यासन संग्रहार्थ आ(क्षेप्र).

कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञप्ति शुल्काची वसुली ......

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन निर्णय क्रमांकः घभाव-२०२२ /प्र.क्र.०७/२०२२/सेवा-५**
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०२३.

वाचा-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :सीपीओ-१४७८/सी. आर.-३२७/सेवा-५, दि.१७ एप्रिल, १९७८
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :वेपूर-१२८७/६४३/ सेवा-१०, दि.२५ एप्रिल, १९८८
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-१४८९/४०/सेवा-५, दि.३० डिसेंबर, १९९१
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा-५, दि.१७ फेब्रुवारी, २००१
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-१००४/प्र.क्र.२८/सेवा-५, दि.२१ सप्टेंबर, २००६
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दि.१४ मार्च, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दि.१९ एप्रिल, २०११

## शासन निर्णय

मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ खंड १ मधील नियम ८४९(बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस त्यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणित भाडे ह्यापैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क द्यावे लागते.

२. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. या सुधारणा लक्षात घेता शासकीय निवासस्थानाच्या अनुज्ञप्ती शुल्काच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधीच्या सर्व बाबींचा विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनसंरचनेनुसार कर्तव्यस्थानी पुरविलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या शासकीय निवासस्थानांसाठीचे अनुज्ञप्ती शुल्काचे दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील व ते सर्व राज्यभर एकरुपतेने लागू असतील. संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनानुरुप निवासस्थानाच्या पात्रतेचा विचार न करता प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या निवासस्थानाच्या प्रकारासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसुली केली जाईल.

**तक्ता**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेला वेतन स्तर (रुपये) | अनुज्ञेय निवासस्थानाचा प्रकार | अनुज्ञेय चटईक्षेत्र (चौरस फूट) | अनुज्ञप्ती शुल्काचा ठराविक दर (रुपये दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | एस-१ ते एस-५ | एक | २२० पर्यंत | २४० |
| २ | एस-६ ते एस-१० | दोन | २२१-३२० | ५२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | एस-११ ते एस-१३ | तीन | ३२१-४२० | ८८० |
| ४ | एस-१४ ते एस-२० | चार | ४२१-५५० | ११६० |
| ५ | एस-२१ ते एस-२५ | पाच | ५५१-७५० | १८४० |
| ६ | एस-२६ व त्याहून अधिक | सहा | ७५१-१११० व त्याहून अधिक | २८०० |

३. अनुज्ञप्ती शुल्काचे वरील सुधारित दर दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून अंमलात येतील.

४. काही शासकीय निवासस्थानांना सेवकांसाठी निवासव्यवस्था आणि/अथवा स्वतंत्र वाहनतळ, छप्पर असलेली किंवा छप्पर नसलेली जागा (गॅरेज) जोडलेली असते. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून मुख्य निवासस्थानांच्या धारकाकडून सेवकाच्या निवास व्यवस्थेसाठी व चार चाकी वाहनाच्या वाहनतळासाठीच्या अतिरिक्त जागेसाठी खालीलप्रमाणे स्वतंत्र शुल्काची वसुली करण्यात यावी:-

| अ.क्र. | मुख्य निवासस्थानाबरोबरची अतिरिक्त जागा | शुल्काचा दर (रु. दरमहा) |
|---|---|---|
| १ | सेवकाचे निवासस्थान | २४० |
| २ | स्वतंत्र वाहनतळ (गॅरेज) | २४० |
| ३ | वाहनासाठी छप्पर असलेली जागा | १६० |
| ४ | वाहनासाठी उघडी जागा | ८० |

५. वर परिच्छेद २ मध्ये विहित केलेल्या दराने करावयाच्या अनुज्ञप्ती शुल्काच्या वसुली शिवाय सेवा शुल्काची स्वतंत्र वसुलीही तशीच चालू ठेवण्यात यावी. शासनाने असेही ठरविले आहे की, दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून विद्यमान सेवा शुल्क दुप्पट करण्यात यावे. प्रत्येक निवासस्थानासाठी किंवा निवासस्थानाच्या समुहांसाठी सेवा शुल्काचे सुधारित दर दर्शविणारे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील.

६. मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील ह्यासंबधातील सध्याच्या तरतुदी या आदेशाच्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्या आहेत असे समजले जावे. या नियमांना औपचारीक सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०११९११४९००९८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by VINAYAK ARVIND DHOTRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible], cn=VINAYAK ARVIND DHOTRE
Date: 2023.01.19 12:08:11 +05'30'

**(वि. अ. धोत्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई |